(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

# धर्मनिरपेक्ष चळवळ : काळाची गरज

प्रा.डॉ. लांडगे पी. एस.

राज्यशास्त्र विभागप्रमुख के.के.एम.महाविद्यालय, मानवत जि. परभणी, मो.नं. ८९७५४५४५७५

**प्रस्तावना :** भारतात व्यापक प्रमाणात धार्मिक विविधता आढळून येते. धार्मिक विविधता प्राचिन काळापासून चालत आलेली आहे. भारतात अनेक धर्माचे लोक वास्तव्यास आहेत. म्हणून भारतीय घटनाकारांनी धर्मनिरपेक्ष राज्याचा स्विकार केला. स्वातंत्र्यपुर्व काळापासून हिंदू–मुस्लिम जातीत होत असलेला संघर्ष, त्यातून अनेक जातीय दंगली झाल्यात, याचा परिणाम म्हणजे पाकिस्तानची निर्मिती झाली.जातीय धार्मिक सलोखा राखला जावा, पुन्हा जातीय, धार्मिक दंगली थांबवाव्यात, एकसंघ भारत रहावा म्हणून ८२ व्या घटना दुरुस्तीनुसार धर्मनिरपेक्ष तत्वाचा स्विकार केला गेला. या घटना दुरुस्तीनुसार प्रत्येक धर्माला विशिष्ट चौकटीतच स्वातंत्र्य दिले जाईल असे घोषित करण्यात आले आहे.राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत धर्मनिरेक्ष राज्य निर्माण करणे हा राज्यघटनेचा उद्देश सांगितला आहे. घटनेतील मुलभूत अधिकाराची तरतूदही याची साक्ष देते. भारतीय घटनेनुसार कोणताही धर्म श्रेष्ठ, कनिष्ठ नसुन सर्वधर्म हे समान आहेत. प्रत्येक धर्माला घटनेनुसार समान लेखले जाईल. व्यक्तीगत जीवनात धर्माला महत्व असेल मात्र राज्याने सर्व धर्म समभाव हे तत्व स्विकारले आहे.

जाती–धर्माच्या संदर्भात बोलायचे तर भारतात जितक्या जाती–जमाती, उपजाती, पोटजाती आहेत तेवढ्या अन्यत्र कोणत्याही देशात नाही. भारत देश हा जगात धर्म निरपेक्ष म्हणून ओळखला जातो परंतु वास्तवात मात्र भारतीय जनता धर्माधिष्ठीत आहे. प्रत्येक व्यक्तीच्या आचरनात धर्म–जातीचा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे तत्व व व्यवहार यात एकमत दिसते. जाती व्यवस्था पाळू नये, अस्पृश्यता पाळू नये असा कायदा झाला असला तरी आजही भारतात अस्प ृश्यता, जातीयता पाळली जाते हे विधायक सत्य आहे. तसेच ज्या जातींनी वर्चस्व प्रस्तापित केलेले आहे. अशा जातींनी राजकीय क्षेत्रात आपला पाया पक्का केलेला आहे. हे धर्म निरपेक्ष तत्वाला बाधक आहे.

**धर्म आणि राजकारण :**

धर्म आणि राजकारण यांचे संबंध कसे असावेत हा एक वादग्रस्त विषय आहे. भारतीय घटनेच्या कलम २४ व २६ मध्ये धार्मिक स्वातंत्र्याचा आधिकार स्पष्ट केलेला आहे. शांतता व सुव्यवस्था सुरक्षित ठेऊन प्रत्येक नागरिकाला आपल्या धर्माचा प्रसार व पालन करता येईल. भारतीय नागरिकाला कोणताही धर्म स्विकारता येईल आणि त्याचा आचार व विचार करता येईल. परंतु इतर नागरिकांच्या धर्माच्या नावाखाली कोणत्याही व्यक्तीला राजकारणात हस्तक्षेप करता येणार नाही. सर्व नागरिकांना त्यांचा धर्म,जात,वंश, जन्म ठिकाण, वास्तव असा भेद न करता समानतेची वागणुक देण्यात येईल. याचा अर्थ भारतीय राज्यघटनेमध्ये नागरिकांना धर्म स्वातंत्र्य बहाल करुन धर्मातील राज्याचा पुरस्कार केलेला आहे.

४२ व्या घटना दुरुस्तीनुसार भारत देश धर्मनिरपेक्ष आहे आणि धर्म निरपेक्षता हा भारतीय घटनेचा आत्मा आहे. भारतीय राज्यव्यवस्थेने स्विकारलेली धर्मनिरपेक्षता ही आदर्श स्वरुपाची आहे असे वेळोवेळी स्पष्ट देखील झालेले आहे. आदर्श हे नेहमी आदर्शवादीच असतात. त्यांना व्यवहारात आणणे अतिशय कठीण आहे. ही उणीव भारतीय धर्मनिरपेक्षतेच्या बाबतील लागु होते. भारतीय धर्मनिरपेक्षता हि एक आदर्श संकल्पना असुन शासनकर्त्यांच्या व लोकांच्या अंगात ती पूर्ण पणे भिनवलेली नाही. भारतातील धर्मनिरपेक्षता हे एक अपुर्ण स्वप्न राहिले आहे. भारतीय घटनेने धर्मनिरपेक्षता या तत्वांचा स्विकार केलेला असला तरी प्रत्यक्षातील वस्तूस्थिती अतिशय वेगळी आहे. धर्मनिरपेक्षतेच्या बाबतीत शासनाची भूमिका अतिशय वेगळी आहे. प्रस्थापित शासनाला किती पाठिंबा मिळतो यावर अवलंबून असते. केवळ घटनात्मक तरतुदीच्या आधारे धर्मनिरपेक्षतेची स्थापना होत नाही तर त्यासाठी आवश्यक असलेला अल्पसंख्यांकाचा पाठिंबा तितकाच महत्वाचा ठरतो. आज भारतात हिंदू हे

बहुसंख्यांक आहेत तर मुस्लीम हे अल्पसंख्यांक आहेत. परंतु अल्पसंख्यांक हे शसनाच्या हेतूविषयी आजही शंका घेतात. काही शासनकर्ते वोटबँकसाठी अल्पसंख्याकाचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे आज भारतीय राजकारणात अल्पसंख्यांक व बहुसंख्यांक यांच्यात दरी निर्माण झाली आहे. त्याचा फायदा राजकीय पक्ष करुन घेतांना दिसतात. भारतीय राजकारणात अल्पसंख्याक आणि बहुसंख्यांक असा फरक केला जातो. त्यामुळे भारतीय राजकारणात धार्मिक अल्पसंख्य आणि बहुसंख्य हा वाद चालूच आहे.

**राजकीय पक्षांचे धार्मिक राजकारण :**

भारतात धर्म आणि राजकारण यांची सरमिसळ झाल्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. भारतीय घटनेने धर्मनिरपेक्षतेचा स्विकार केला आसला तरी भारतातील राजकीय पक्ष आणि राजकीय नेते यांनी मात्र घटनाकारांच्या उदात्त भवनेची फारशी कदर केलेली दिसून येत नाही. राजकीय पक्षांनी राष्ट्रहितापेक्षा व्यक्तीगत हित महत्वाचा वाटतो. या प्रवृत्तीतून धर्मांदतेला राजकारणात प्रवेश मिळतो.भारतीय धर्माचा समाजमनावर धर्माचा प्रभाव असल्यामुळे लोक धार्मिक आवाहनाला आणि प्रचाराला सहजासहजी बळी पडतात. याचा फायदा देशातील राजकीय पक्ष घेतात. भारतात सध्या अनेक जाती—धर्माच्या आधारे राजकीय पक्षांची निर्मिती झालेली दिसून येते आणि प्रत्येक राजकिय पक्ष सार्वजनिक निवडणुकीत विशिष्ट धर्माचा आधार घेण्याचा प्रयत्न करतो. उदा. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापसुन आजपर्यंत काँग्रेस पक्षाने मुस्लिम धर्माचा आधार घेतलेला दिसतो. तसेच भारतात विविध धर्मियांनी आपले हितसंबंध जोपासण्यासाठी संघटना स्थापन केल्या आहेत. उदा. हिंदूच्या हिंदू महासभा, बजरंगदल, विश्वहिंदू परिषद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ इत्यादी तर मुस्लिमांच्या मुस्लिम लिग, जमात—ए—इस्लामी, मजीलस—ए—मुशवत इत्यादी संघटना आहेत. आपल्या धर्मियांचे राजकीय हित जोपासण्याचा प्रयत्न या संघटना करतात. सर्वाजनिक निवडणुकीत राजकीय पक्ष प्रचार करतांना धर्माचा आधार घेतात. राजकीय नेते प्रचाराची सुरुवात धार्मिक स्थळापासुन करतात. त्यामुळे धर्मनिरपेक्षता हे तत्व पायदळी तुडविले जाते.

भारतातील राजकीय पक्ष आणि त्यांनी स्वहितासाठी अनेक वेळा हिंदू आणि मुस्लिम धर्मामध्ये तेढ निर्माण केलेला दिसुन येतो. प्रसंगी हिंदू आणि मुस्लिम यांच्यात अनेक वेळा संघर्ष उदभवले आहेत.धार्मिक दंगली झाल्या आहेत. दोन्ही धर्मातील लोक एकमेकांवर हल्ले करतात. हिंसा मोठ्या प्रमाणात होते त्यामुळे जीवन जगण्याचा हक्क हिरावून घेतला जातो. ६ डिसेंबर १९९२ साली हिंदूंनी बाबरी मशीद पाडली व त्यानंतर हिंदू—मुसलमानात धार्मिक दंगे झालेत. परंतु त्याचा परिणाम आजही दोन्ही धर्माला भोगावे लागत आहे. धार्मिक संघर्ष केवळ हिंदू आणि मुस्लिमातच होतात असे नव्हे तर ख्रिश्चन यांच्यातही धार्मिक वाद होतांना दिसतात. जेव्हा लोकशाही राजकीय व्यवस्थेत धर्म हा घटक प्रभावी ठरतो तेव्हा ती लोकशाही जीवन पध्दती बनत नाही तर समाजात धार्मिक भेद निर्माण होतात. मुल्यांचा ऱ्हास होतो. खरी लोकशाही निर्माण न होता लोकशाहीचा सांगाडा निर्माण होतो. जर राजकारणात सातत्याने धर्माचा वापर होत राहिला आणि धर्मात राजकारण उतरले तर धर्म निरपेक्षतेला धोका निर्माण होतो.राजकारणात धर्माचे प्राबल्य वाढल्यामुळे काही धर्मातील राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण झाला आहे. राष्ट्राऐवजी धर्म श्रेष्ठ हि भवना प्रभावी ठरत आहे. त्यात स्वार्थी आणि संकुचित नेतृत्वाची भर पडते. असे स्वार्थी नेतृत्व देशाला घातक ठरते. याचा परिणाम स्वार्थी नेतृत्वाने वेगळी वाट धरली आहे. त्यांना विकासाच्या प्रवाहापासुन बाजुला ठेवले आहे. त्यामुळे त्यांचा राष्ट्रप्रेमाबद्दल शंका उपस्थित केली जाते. भारतात धर्म आणि राजकारणात एकत्र आल्यामुळे धार्मिक भेद वाढत चालले आहे. राजकारणात धर्माचे प्रस्थ वाढण्यास हिंदू आणि मुस्लिम दोन्ही धर्म तेवढेच जबाबदार आहेत. काँग्रेस पक्षासहित सर्वच राजकीय पक्ष कमी अधिक प्रमाणात धर्मांधतेचे राजकारण करतांना दिसतात.स्वातंत्र्य पुर्व काळापासून हिंदू मुस्लिम वाद चालू आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर काँग्रेस पक्षाला सतत पाठिंबा देणाऱ्या मुस्लिम समाजाने १९९७ साली सार्वजनिक निवडणुकीत जनता पक्षाला पाठिंबा दिला होता. काँग्रेस पक्षाने वेळोवेळी सत्ता

मिळविण्यासाठी आणि टिकविण्यासाठी आणि धर्मांधतावादी व जातीयवादी पक्षांशी युती केली आहे. महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मराठा जातीचा वापर करतो तर बहुजन समाज पक्ष दलित, रिपब्लीकन पक्ष — दलित, अकाली दल — शिख, नेशनल कॉन्फरन्स —मुस्लिम, तेलगु देशम — रेडडी, मनसे, शिवसेना — ब्राम्हण, भाजप — ब्राम्हण इत्यादी विविध जाती, धर्माचा वापर करुन राजकारण करतांना दिसतात. भारतातील राजकीय पक्ष, नेते, कार्यकर्ते हे धर्मनिरपेक्ष तत्वांनी वागतांना दिसत नाही. निवडणुका तर जात, धर्मावर लढवल्या जातात. त्यामुळे धर्मनिरपेक्ष तत्व हे फक्त घटनेतच शोभून दिसते.

भारतीय जनता पक्षाने १९८९ मध्ये रामजन्मभूमी प्रकरणाचा वापर आणि लोकसभेच्या ८८ जागा जनता दलाशी आघाडी करुन मिळविल्या. भाजपचे अध्यक्ष लालकृष्ण अडवाणींच्या नेतृत्वाखाली २४ सप्टेंबर १९९० ते ३० ऑक्टोंबर १९९० अशी ३६ दिवसांची रथयात्रा काढली.या रथयात्रेची परिणती अयोध्येत राममंदिर उभारण्यात झाली. मात्र राष्ट्रीय आघाडीचे सरकार कोसळण्यात आले. रामजन्मभूमी बाबरी मशीद वादामुळे दूर गेले. केंद्रात काँग्रेसचे सरकार असतांना ६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मशीद पाडण्यात आली आणि याच दिवशी भारताच्या धर्मानिरपेक्ष राजकारणला तडे गेले. धर्माच्या आधारे देशाची विभागणी होते की काय अशी भिती निर्माण झाली होती. १९४७ मध्ये हिंदू—मुस्लिम संघर्षात देशाची मांडणी झाली आणि पाकिस्तानची निर्मिती झाली. परंतु अद्यापही हिंदू—मुस्लिम समस्यांचे निराकरण झालेले नाही.याचे करण असे की, फाळणीनंतर जे मुस्लिम बांधव आपल्या देशात राहिले ते भारताच्या राष्ट्रीय प्रवाहात सामिल झालेले नाहित. जम्मू कशमीरच्या प्रदिर्घ चालत आलेला प्रश्न आता मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कलम ३७० रद्द करुन कशमीर प्रश्न सोडवला. आता जम्मू कशमीर हे आता दोन स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश निर्मान करण्यात आले. प्रदिर्घ काळापासून चालत आलेला हिंदू—मुस्लीमांची श्रध्दा स्थान असलेले अयोध्येतील प्रश्न सुप्रिम कोर्टाने सोडवला. आता बाबरी मशीदच्या जागेवर राम मंदिर उभारण्याची परवानगी देण्यात आली तर बाबरी मज्जीद बांधण्यासाठी सरकारणे पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याचे आदेश देण्यात आलेत. भारताच्या इतिहासात हे दोन गंभीर प्रश्न निकाली काढून मुस्लिम—हिंदूतील वाद सुटलेले दिसतात. वास्तविक पाहता हिंदू—मुस्लीम यांच्यातील संबंध हे अतिसंवेदनशिल आहेत. त्यामुळे दोघांमधील धर्म पिसाट राजकारण्यांनी स्वत:च्या लाभासाठी लोकांच्या धार्मिक श्रध्दांचा वापर करुन घेत आहेत. ते आता थांबले पाहिजे.

**सारांश** : भारतात खऱ्या अर्थाने धर्म निरपेक्ष राज्य निर्माण करावयाचे असेल तर आगोदर जनतेने आपल्या मनातून धर्म जातीला हद्दपार करायला हवे. धर्म जातीचा आधार घेऊन निवडणुका लढणाऱ्या पक्षाला,नेत्याला सत्तेपासून हद्दपार केले पाहिजे. तसेच सर्व राजकीय पक्षांनी धर्मांधतेचे राजकारण करण्याचे सोडून दिले पाहिजे.धर्मांधतेचे राजकारण करणाऱ्या सर्व राजकीय पक्षांवर कायद्याने बंदी घातली पाहिजे. धर्माचा कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप राजकारणात होणार नाही याची दक्षता सरकाने, जनतेने,नोत्यांनी घेतली पाहिजे. धर्म विरहीत, जातविरहीत राजकारण होण्यासाठी आर्थिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील सर्व घटकांनी प्रयत्न करणे काळाची गरज आहे. आज देशात धर्मनिरपेक्ष राष्ट्राची संकल्पना प्रत्यक्षात उतरण्यासाठी देशातील प्रत्येक नागरिकाने राजकीय पक्षाने, संघटना, नेता, कार्यकर्ता, सामाजिक चळवळी यांनी जाणीवपुर्वक प्रयत्न करुन धर्मनिरपेक्ष तळागाळात पोचवण्याची गरज आहे.

**संदर्भ ग्रथ :**

१. आचार्य डॉ. दुर्गादास बसु — भारत का संविधान
२. डॉ. साबळे आर.डी. — भारतीय शासन आणि राजकारण
३. डॉ. होशियार सिंह — भारतीय प्रशासन
४. डॉ. लांडगे पी.एस. — भारतीय शाासन आणि राजकारण
५. डॉ. लांडगे पी.एस. — भारतीय राजकारणाचे बदलते स्वरुप व उपाय
६. डॉ. लांडगे पी.एस. — भारतीय लोकशाही आणि सुशासन